॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

**North Maharashtra University, Jalgaon**

**उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव**

पत्रपेटी क्र. ८०, उमविनगर, जळगाव- ४२५००१

दूरध्वनी क्र. (०२५७) २२५७२४८, २४९, २५३ फॅक्स क्र. २२५८४०३, ४०६

'A' Grade

(NAAC Re-Accredited)

3rd Cycle

**Public Relations Office** **जनसंपर्क विभाग**

## बातमी क्र.१

जळगाव दि. ५ ( ) उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या कला व मानव्यशास्त्र प्रशाळेअंतर्गत डिपार्टमेंट ऑफ परफार्मिंग आर्टस् ॲण्ड फाईन आर्टस् विभागातर्फे उदया शनिवार, दि.१० मार्च २०१८ रोजी सुप्रसिध्द संगीतकार कौशल ईनामदार यांच्या उपस्थितीत, संगीत नियोजनातील बारकावे व सादरीकरणाचे तंत्र या विषयावर एक दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले आहे.

संगीतकार कौशल ईनामदार यांच्या हस्ते सकाळी १०.३० वाजता या चर्चासत्राचे उद्घाटन होणार आहे. यावेळी प्र-कुलगुरु प्रा.पी.पी.माहुलीकर हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत. संगीताच्या आवड असणाऱ्या विद्यार्थ्यांनी नोंदणीसाठी प्रा.संजय पत्की (९४०५४४०५५५), प्रा.अलका चव्हाण (९२२३९७३२९९), तेजस मराठे (९४२२२ ३५४५८) यांच्याशी संपर्क साधावा असे आवाहन प्रशाळेचे संचालक डॉ.तुकाराम दौड व विभागप्रमुख प्रा.संजय पत्नी केले आहे.

---

## बातमी क्र.२

जळगाव दि. ९ ( ) उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या रसायन तंत्रज्ञान संस्थेतर्फे २३ व्या ओपन हाऊस `इन्फीनिटी- २०१८` या कार्यक्रमात झालेल्या सामान्यज्ञान स्पर्धेत प्रदीप चव्हाण (प्रथम ) तर रवी विनायक (द्वितीय) क्रमांकाचे मानकरी ठरले.

या स्पर्धेतील तृतीय क्रमांक धोंडीबा तालेवार याने पटकावला. तिसऱ्या दिवशी ७ मार्च रोजी सांस्कृतिक कार्यक्रमाचे उद्घाटन प्रा.जे.बी.नाईक, संचालक, युआयसीटी यांच्या हस्ते करणत आले. सदर कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी नृत्य, समूह नृत्य, गायन, नाटक अशा विविध स्पर्धेतून आपल्या सुप्त गुणाचा परिचय दिला. गायन स्पर्धेत प्रथम अक्षय, द्वितीय शुभम पाटील, तृतीय प्रशांत यांना पारितोषिके प्राप्त झाली. समुह गायन स्पर्धेत खुशी धांडे, कोमल सोनवणे विजयी ठरले. नृत्य प्रकारात प्रथम श्रुतिका सोनारे, द्वितीय शिवानी निंबेकर, तीय गायत्री कोल्ह व आरती अटकर ठरले. फॅशन परेड या प्रकारात झोडायिक साईन ही उत्कृष्ट थीम म्हणून घोषित करण्यात आली. जान्हवी खंडेलवाल हिला उत्कृष्ट पोषाखाचे पारितोषिक मिळाले तर रुपाली चौधरी व सिद्वेश महाले यांची उत्कृष्ट जोडी म्हणून निवड करण्यात आली. सदर स्पर्धेत पपीहा गायकवाड ही फॅशन क्वीन तर मोहित शहा हा फॅशन किंग ठरला.

---

जा.क्र. उमवि/१६/हस्तदेय /२०१८ दि. ९ मार्च, २०१८

प्रति,

**मा. संपादक / प्रतिनिधी,**

कृपया, उपरोक्त बातमी आपल्या तीनही जिल्हयाच्या आवृत्तीत प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू,

स्वाक्षरीत प्रत/-

(सुनील पाटील)

जनसंपर्क अधिकारी